ePaper
सूरज चव्हाण यांना ईडीकडून अटक, खिचडी घोटाळा प्रकरणी कारवाई, शिवसेना ठाकरे गटाला धक्का!

| वर्ष - 7 । अंक - 249 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



## आतील पानांत

- रोहितच्या उतान्यानंतर रिंकूचा तडाखा
- मोदींना जाणवली दीदींची कमी
- 500 च्या नोटेवर श्रीरामाचा फोटो?
- पंतप्रधान नरेंद्र मोदींचंही वय झालं

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 18 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

। पिंपरी । महाईन्यूज । ।

**हिंजवडी आयटी हब आणि पिंपरी-चिंचवडला जोडणारा प्रमुख दुवा वाकड-दत्तमंदिर रस्ता विकास आराखड्याप्रमाणेच विकसित केला जाईल. ४५ मीटर रस्ता रुंदीकरणासाठी अतिक्रमण हटवून जागा ताब्यात घेण्यात येईल, असे आश्वासन पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिले.**

## महापालिका आयुक्तांचे सोसायटीधारकांना आश्वासन: 45 मीटर रुंदीकरणासाठी जागा ताब्यात घेणार!



# वाकड-दत्तमंदिर रोडची 'कोंडी' फुटणार!

## भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांची निर्णायक बैठक




पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने पुढाकार घेतला. संबंधित रस्ता ४५ मीटर रुंद होईल, असा दावा केला होता. मात्र, प्रत्यक्षात काही ठिकाणी ३० मीटर रुंदीचाच रस्ता वाहनचालकांच्या माथी मारला जात आहे. त्यामुळे या भागातील एकूण २७ सोसायट्यांनी महापालिका प्रशासनाकडे लेखी तक्रारी केल्या आहेत.

याबाबत भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या पुढाकाराने पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनचे उपाध्यक्ष सचिन लोंढे आणि प्रतिनिधी यांच्यासोबत महापालिका आयुक्त शेखर सिंह व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक महापालिका भवनात घेण्यात आली. यावेळी माजी नगरसेवक विनायक गायकवाड उपस्थित होते.

वाकड-दत्तमंदिर रोड रुंदीकरणाबाबत स्थानिक सोसायटीधारकांनी आक्षेप घेतले आहेत. विकास आराखड्याप्रमाणे हा रस्ता ४५ मीटर होणे अपेक्षीत आहे. महापालिका प्रभाग क्रमांक २५ मध्ये असलेल्या वाकड-दत्तमंदिर रोडचे रुंदीकरण विकास आराखड्यातील नियोजनाप्रमाणे होत नाही. काही ठिकाणी अनिकृत बांधकामे आहेत. त्याला प्रशासनाकडून अभय देण्यात येत असून, त्या ठिकाणी रस्त्याची रुंदी अगदी ३० मीटरपर्यंतच ठेवण्यात आली आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजुंना अनधिकृत बांधकामे आहेत. त्यामुळे रस्त्यांची रुंदी कमी झाली आहे. त्यामुळे विकास आराखड्यात मंजूर असलेल्या नियोजनाप्रमाणे सदर रस्त्याचे काम करावे, अशी परिसरातील सोसायटीधारकांची मागणी आहे.

दरम्यान, याबाबत भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप आणि माजी नगरसेवक विनायक गायकवाड यांनी सकारात्मक पुढाकार घेतला. त्यांच्या उपस्थितीमध्ये महापालिका आयुक्त व संबंधित अधिकारी व सोसायटीधारक प्रतिनिधी यांची बैठक झाली. यावेळी जे शेतकरी, जागा मालकांनी जमीनीचा मोबदला घेतला आहे. त्या जागांचा ताबा महापालिका प्रशासनाने घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. यावर विकास आराखड्याप्रमाणे ४५ मीटर रस्ता करण्याबाबत सर्वोतोपरी प्रशासन कार्यवाही करणार आहे. काही ठिकाणी जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया काही दिवसांत सुरू करण्यात येईल, असे आश्वासन आयुक्त शेखर सिंह यांनी दिले आहे.

> वाकड- दत्त मंदिर रोड परिसरातील स्थानिक सोसायटीधारकांनी दत्त मंदिर रोड रुंदीकरणाबाबत नोंदवलेले आक्षेप रास्त आहेत. विकास आराखड्याप्रमाणे प्रशासनाने ४५ मीटर रस्ता नागरिकांसाठी उपलब्ध करुन द्यावा. त्यासाठी सध्या सुरू असलेल्या रस्त्याचे कामाची पाहणी करावी. अशी मागणी आम्ही प्रशासनाकडे केली.
>
> **-सचिन लोंढे,** उपाध्यक्ष, पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशन.



> दत्त मंदिर रस्ता रुंदीकरणाबाबत स्थानिक नागरिक, सोसायटीधारकांनी अनेकदा प्रशासनाकडे तक्रारी केल्या आहेत. याबाबत वारंवार चर्चा झाली आहे. त्यामुळे सोसायटीधारकांसोबत आयुक्त शेखर सिंह आणि संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्यामध्ये विकास आराखड्याची अंमलबजावणी करुन रस्ता रुंदीकरण करावे. या मार्गावरील वाहतुकीचा ताण पाहता प्रशासनाने गांभीर्याने उपाययोजना कराव्यात, अशी सूचना केली. याला आयुक्त शेखर सिंह व संबंधित अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.
>
> **-शंकर जगताप,** शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड..

# शहरी गरीब कार्डचे आपोआप नूतनीकरण

## » शहरी गरीब कार्ड पहिले चार महिनेच मिळणार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दवाखान्यामध्ये रुग्ण दाखल झाल्यानंतर दिल्या जाणाऱ्या शहरी गरीब योजनेच्या कार्डमुळे लेखापरीक्षणात त्रुटी व अनियमितता निर्माण होत आहे. त्यामुळे शहरी गरीब योजनेचे कार्ड 1 एप्रिल ते 31 जुलै या चार महिन्यांतच दिली जाणार आहेत. यासंबंधीचा प्रस्ताव महापालिकेच्या आरोग्य विभागाने तयार केला असून, यावर अंशदायी वैद्यकीय समितीच्या (सीएचएस) बैठकीत शिक्कामोर्तब केले जाणार आहे.**

तसेच मूत्रपिंड विकार,हृदयरोग व कर्करोग हे आजार दीर्घकालीन असल्याने या रुग्णांच्या कार्डचे दरवर्षी आपोआप नूतनीकरण करण्याचाही विचार केला जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.शहरातील पिवळे, केशरी रेशन कार्ड, झोपडपट्टीमध्ये राहणारे सेवाशुल्कधारक आणि ज्यांचे वार्षिक उत्पन्न 1 लाख रुपये आहे, अशा गरीब कुटुंबांसाठी महापालिकेकडून 2011 पासून शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजना राबविली जात आहे. ज्यावेळेस ही योजना सुरू करण्यात आली, त्या वेळचे नागरिकांचे उत्पन्न आणि सध्याचे उत्पन्न यामध्ये मोठा बदल झाला आहे. या बाबींचा विचार करून शहरी गरीब योजनेचा लाभ घेण्यासाठी निश्चित केलेली वार्षिक उत्पन्नाची 1 लाखाची मर्यादा वाढवून ती 1 लाख 60 हजार करण्यात आली आहे. योजनेचे कार्ड असलेल्या कुटुंबातील व्यक्तींना महापालिकेच्या पॅनलवरील खासगी रुग्णालयांमध्ये उपचार घेण्यासाठी एक लाखापर्यंत आर्थिक मदत मिळते. तसेच किडनी, हार्ट व कॅन्सर या दीर्घकालीन आजाराच्या उपचारासाठी वर्षाला दोन लाख रुपये मदत मिळते. योजनेतील गैरप्रकार टाळण्यासाठी सप्टेंबर 2022 पासून योजनेमध्ये संगणक प्रणालीचा वापर केला जात



आहे. त्यामुळे कागदपत्रांमधील अफरा-तफरी उजेडात आल्या आहेत. दरम्यान, अनेकवेळा रुग्ण दवाखण्यात दाखल केल्यानंतर नातेवाईकांकडून शहरी गरीब योजनेचे कार्ड काढण्यासाठी धावपळ केली जाते.

यामध्ये उत्पन्नाचा दाखला मिळण्यासाठी तीन चार दिवसांचा कालावधी लागतो. उत्पन्नाचा दाखला मिळवण्याठी केलेल्या अर्जाची टोकन पावती सादर केल्यानंतर ही माणुसकीच्या नात्याने योजनेचे सभासदत्व देऊन वैद्यकीय उपचारांची हमीपत्र दिली जातात. मात्र, काही तांत्रिक कारणामुळे अनेकवेळा उत्पन्नाचा दाखला तहसीलदारांकडून नाकारला जातो.त्यामुळे रुग्णाला घरी सोडले तरी महापालिकेकडे उत्पन्नाचा दाखला जमा होत नाही. शिवाय रुग्णाला दाखल केल्यानंतर कार्ड काढण्याच्या प्रक्रीयेत तीन चार दिवस जातात. मग या तीन चार दिवसांचे रुग्णालयाचे बिल अदा करताना महापालिकेला अडचणी येतात. तसेच आर्थिक वर्ष संपत असतानाही राजकीय दबावापोटी योजनेची कार्ड द्यावी लागतात. अशा कार्डांची बिले पुढील आर्थिक वर्षात येतात. या सर्व गोष्टींमुळे लेखापरिक्षणामध्ये त्रुटी व अनियमितता आढळून येते.

अशा वेळी कार्ड व बिल मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाते. या सर्व पार्श्वभूमीवर शहरी गरीब योजनेचे सभासद कार्ड संपूर्ण आर्थिक वर्षभर न देता केवळ 1 एप्रिल ते 31 जुलै या चार महिन्यातच देण्याचा निर्णय आरोग्य विभागाने घेतला आहे. यासंबंधीचा प्रस्ताव आरोग्य विभागाने तयार केला असून तो नुकताच अतिरिक्त आयुक्तांपुढे ठेवण्यात आला आहे. यावर अंशदायी वैद्यकीय समितीच्या (सीएचएस) बैठकीत चर्चा करून शिक्कामोर्तब करण्यात येणार आहे. ज्यावेळेस ही योजना सुरू करण्यात आली, त्या वेळचे नागरिकांचे उत्पन्न आणि सध्याचे उत्पन्न यामध्ये मोठा बदल झाला आहे.

या बाबींचा विचार करून शहरी गरीब योजनेचा लाभ घेण्यासाठी निश्चित केलेली वार्षिक उत्पन्नाची 1 लाखाची मर्यादा वाढवून ती 1 लाख 60 हजार करण्यात आली आहे. योजनेचे कार्ड असलेल्या कुटुंबातील व्यक्तींना महापालिकेच्या पॅनलवरील खासगी रुग्णालयांमध्ये उपचार घेण्यासाठी एक लाखापर्यंत आर्थिक मदत मिळते. तसेच किडनी, हार्ट व कॅन्सर या दीर्घकालीन आजाराच्या उपचारासाठी वर्षाला दोन लाख रुपये मदत मिळते. योजनेतील गैरप्रकार टाळण्यासाठी सप्टेंबर 2022 पासून योजनेमध्ये संगणक प्रणालीचा वापर केला जात आहे.

### 'एफपीओ'ना परवानगी द्या

» किडनी, हार्ट व कॅन्सर आजारांवरील उपचारासाठी दोन लाखांपर्यंत मदत केली जाते. हे आजार दीर्घकालीन असल्याने संबंधित रुग्णांच्या कुटुंबास पुन्हा तीच कागदपत्रे सादर करण्याचे कष्ट पडू नयेत. त्यांचा त्रास वाचावा यासाठी दीर्घकालीन आजार असलेल्या कुटुंबाच्या सभासद कार्डचे दरवर्षी आपोआप नूतनीकरण करण्याचा विचार सुरू आहे. यावरही अंशदायी वैद्यकीय समितीच्या बैठकीत शिक्कामोर्तब होणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.तसेच मूत्रपिंड विकार, हृदयरोग व कर्करोग हे आजार दीर्घकालीन असल्याने या रुग्णांच्या कार्डचे दरवर्षी आपोआप नूतनीकरण करण्याचाही विचार केला जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.शहरातील पिवळे, केशरी रेशन कार्ड, झोपडपट्टीमध्ये राहणारे सेवाशुल्कधारक आणि ज्यांचे वार्षिक उत्पन्न 1 लाख रुपये आहे, अशा गरीब कुटुंबांसाठी महापालिकेकडून 2011 पासून शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजना

# मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवर आज सहा तास वाहतूक बंद राहणार

## » मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवर प्रवास करण्यापूर्वी आजच नियोजन करा!

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पनवेल-कर्जत दुहेरी मार्ग उपनगरी रेल्वे कॉरिडोरच्या कामासाठी मुंबई-पुणे एक्स्प्रेसवर आज(18 जानेवारी) सहा तास वाहतूक बंद राहणार आहे. यामुळे या कालावधीत एक्स्प्रेसवर होणारी वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात आली आहे. मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवर मुंबई मार्गिकेवर पनवेल-कर्जत दुहेरी मार्ग उपनगरी रेल्वे कॉरिडोरचे काम करण्यात येणार आहे. चिखले ब्रिज याठिकाणी आज 18 जानेवारीला सकाळी 11 ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत काम करण्यात येणार आहे.**

रेल्वे कॉरिडोरच्या कामामुळे मुंबई मार्गिकेवर सर्व प्रकारची वाहतूक बंद करण्यात येणार आहे. त्यामुळे पुण्याकडून मुंबई बाजूकडे येणारी हलकी वाहने मुंबई मार्गिका किमी 55.00 वर वळून मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 48 वरून मार्गस्थ करता येतील. 07.560 किमी (चिखले रेल्वे ओव्हर ब्रिज), यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्ग (मुंबई पुणे द्रुतगती मार्ग) 18 जानेवारी सकाळी 11:00 ते संध्याकाळी 5:00 पर्यंत 1. एक्स्प्रेसवेवर पुण्यापासून मुंबईकडे जाणारी हलकी वाहने मुंबई लेन किमी 55.000 बाहेर पडू शकतात आणि मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 48 द्वारे मार्गाचा अवलंब करू शकतात.2. द्रुतगती मार्गावर पुण्याहून मुंबईकडे जाणारी



हलकी वाहने आणि बसेस मुंबई लेन 39.800 खोपोली बाहेर पडू शकतात आणि मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 48 वरून पुढे जाऊ शकतात. 3. पुणे ते मुंबई एक्स्प्रेसवेवरील सर्व प्रकारची वाहने खालापूर टोल गेटवरील शेवटच्या लेनचा वापर करू शकतात, किमी 32.500 ते खालापूर एक्झिटकडे वळतील आणि मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 48 खोपोली मार्गे शेडुंग टोल प्लाझा मार्गे जातील. 4. एक्स्प्रेसवेवर पुण्याहून मुंबईकडे जाणारी वाहने मुंबई लेन 9.600 पनवेल एक्झिट वरून वळू शकतात आणि करंजाडे मार्गे कळंबोलीला जाण्यासाठी मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 48 चा वापर करू शकतात.5. मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 48 वरून पुण्याहून मुंबईकडे जाणारी सर्व वाहने शेडुंग फाट्यावरून पनवेलच्या दिशेने वळवली जातील.वाहतूक बंद केलेल्या तासांमध्ये एक्स्प्रेसवेवर मुंबई मार्गिकेवर हलक्या आणि अवजड वाहनांसह सर्व प्रकारच्या वाहनांना प्रतिबंधित केले जाईल. प्रवाशांनी त्यांच्या प्रवासाचे त्यानुसार नियोजन करावे आणि गैरसोय टाळण्यासाठी पर्यायी मार्ग वापरावेत असे आवाहन करण्यात आले आहे.पनवेल-कर्जत दुहेरी मार्ग उपनगरी रेल्वे कॉरिडोरच्या कामासाठी मुंबई-पुणे एक्स्प्रेसवर उद्या (18 जानेवारी) सहा तास वाहतूक बंद राहणार आहे. यामुळे या कालावधीत एक्स्प्रेसवर होणारी वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात आली आहे. मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवर मुंबई मार्गिकेवर पनवेल-कर्जत दुहेरी मार्ग उपनगरी रेल्वे कॉरिडोरचे काम करण्यात येणार आहे. चिखले ब्रिज याठिकाणी उद्या 18 जानेवारीला सकाळी 11 ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत काम करण्यात येणार आहे. रेल्वे कॉरिडोरच्या कामामुळे मुंबई मार्गिकेवर सर्व प्रकारची वाहतूक बंद करण्यात येणार आहे.

# अनधिकृत पत्राशेडवर 'बुलडोझर'!

## महापालिका प्रशासनाची धडक कारवाई : शहराचे विद्रुपीकरण रोखण्याचा प्रयत्न

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीमधील मोठ्या रस्त्यालगत, सार्वजनिक ठिकाणी अतिक्रमण, अनधिकृत पत्राशेड व वीट बांधकामांवर महापालिकेकडून प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. त्यामुळे बेकायदा पत्राशेड उभारणाऱ्यांची तारांबळ उडाली आहे.**



नागरिकांना सार्वजनिक रस्ते मोकळे करणे, रस्ते, जागा अनधिकृत बांधकामांपासून मोकळ्या करुन देणे हा कारवाईमागील उद्देश आहे. यामुळे सध्या महानगरपालिकेकडून अशा अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणाविरोधात कारवाई करण्यात येत आहे. शहरातील सार्वजनिक जागा नागरिकांच्या सोयीसुविधांच्या दृष्टीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांसाठी, विकासकामांसाठी तसेच सर्वांगीण कल्याणासाठी जतन करणे गरजेचे असून यामुळे शहराच्या सर्वांगीण विकासामध्ये भर पडण्यास मदत होणार आहे, असे आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले.

शहरातील अनधिकृत व्यवसायिक पत्राशेड धारकांद्वारे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले जात असून रस्त्यावरच वाहने उभी केल्याने सर्वसामान्य नागरिकांच्या वाहतूकीस अडथळा निर्माण होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

यामुळे शहराचे विद्रुपीकरण होत असून बकालपणा वाढत आहे. या अडथळ्यांमुळे लहान-मोठे अपघातसुध्दा होत आहेत. सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनावर आणि शहराच्या पर्यावरणावर परिणाम होत आहे. तसेच अधिकृत बांधकाम इमारतीमधील व्यावसायिक गाळेधारकांवरही अन्याय होत आहे. असे अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील यांनी सांगितले.

इथे झाली कारवाई

महापालिकेच्या वतीने 'ड' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत वाकड ते पिंपळे निलख, जगताप डेअरी चौक ते भुजबळ चौक, तसेच 'ब' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत रावेत बीआरटी आणि 'इ' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. 3 मौजे मोशी येथील जय गणेश साम्राज्य चौक ते अलंकापुरम चौक या रस्त्यांलगत असलेल्या अनधिकृत बांधकामांवर अतिक्रमणविरोधी कारवाई करण्यात आली. मागील सात दिवस महानगरपालिका अतिक्रमण असलेल्या बांधकामावर कारवाई करित आहे. याकारवाईदरम्यान 4 लाखांपेक्षा अधिक चौरस फूट क्षेत्रफळामध्ये असणारी अनधिकृत पत्राशेड तसेच वीट बांधकामे पाडण्यात आली.

> नागरिकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आणि शहराचे सौंदर्य टिकवून ठेवण्यासाठी अतिक्रमण समस्यांवर तातडीने उपाय करणे आवश्यक असून महापालिका यासाठी कटिबद्ध आहे. नागरिकांसाठी स्वच्छ, सुंदर आणि संघटित शहरी वातावरण निर्माण करण्यासाठी येत्या महिन्याभरात उर्वरित क्षेत्रीय कार्यालयांतर्गतही अशीच अतिक्रमणविरोधी मोहीम राबविण्यात येणार आहे.
> **-शेखर सिंह,** आयुक्त..

### कारवाई तीव्र करण्यात येणार...

महाराष्ट्र राज्यामधील स्वच्छ सुंदर शहरामध्ये आघाडीवर असणाऱ्या पिंपरी चिंचवड शहराची वेगाने प्रगती होत असून लोकसंख्येमध्येसुध्दा मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. वाढत्या लोकसंख्येच्या सार्वजनिक हिताच्या दृष्टीने शहरातील सर्व प्रमुख रस्ते अडथळे विरहीत असणे गरजेचे आहे. शहरामधील जवळपास सर्वच प्रमुख रस्त्यांवर किंवा रस्त्यालगत अनधिकृत व्यवसायिकांच्या पत्राशेड असल्याने अडथळा निर्माण होत असल्याचे महापालिकेच्या निदर्शनास आले असून त्याबाबत नागरिकांच्या तक्रारीसुद्धा महापालिकेकडे आल्याने महापालिकेच्या वतीने अतिक्रमणविरोधी कारवाई करण्यात येणार आहे.

---

# राम मंदिर राष्ट्रार्पणानिमित्त रामायण वेषभूषा स्पर्धा!

## आमदार लांडगे यांचा पुढाकार : देव-देश-धर्म जागृतीचा प्रयत्न

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**'देव-देश आणि धर्म' याबाबत समाजामध्ये जागृती व्हावी. महर्षि वाल्मिकी रचित हिंदू धर्मातील पवित्र महाकाव्य 'रामायण'मधील प्रभू श्रीराम, माता सीता, बंधू लक्ष्मण आणि रामभक्त हनुमान यांच्या जीवनचरित्रातून मानवजातीला युगानुयुगे प्रेरणा मिळत राहिली आहे. या भगवंत अवतारी चरित्रांचे विचार नव्या पिढीमध्ये रुजावेत, या हेतूने रामायण वेषभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.**




देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते श्रीक्षेत्र अयोध्या येथे राम जन्मभूमी मंदिराचे उद्घाटन व प्राणप्रतिष्ठा दि. २२ जानेवारी २०२४ रोजी होत आहे. या निमित्त प्रखर हिंदूत्ववादी आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने चिखली-जाधववाडी येथील रामायण मैदानावर विविध धार्मिक, अध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. तसेच, शनिवार, दि. २० जानेवारी २०२४ रोजी रामायण वेषभूषा स्पर्धाही होणार आहेत.

सदर स्पर्धा चार गटांमध्ये होणार आहे. ग्रुप- १ - पूर्व प्राथमिक वयोगट, ग्रुप- २ मध्ये ५ ते ८ वयोगट, ग्रुप - ३ मध्ये ९ ते १२ वयोगट आणि ग्रुप- ४ मध्ये वयवर्षे १३ ते १५ पासून पुढे असे नियोजन केले आहे. अधिक माहितीसाठी श्री. राजाराम फड 90118 18304 आणि सौ. सुवर्णा भोंगाळे 9921348228 यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

> हिंदूत्व आणि अखंड भारत या संकल्पनेचा दुवा म्हणजे प्रभू श्रीराम आहेत. सुमारे ५०० वर्षांपासून श्रीक्षेत्र राम जन्मभूमी येथे मंदिर उभारण्यासाठी प्रतीक्षा करावी लागली. पिढ्यान पिढ्यांनी पाहिलेले हे स्वप्न प्रत्यक्षात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मंदिर राष्ट्रार्पण आणि प्राणप्रतिष्ठा होणार आहे. यानिमित्त देशभरात उत्सव साजरा होतो आहे. रामायण वेषभूषा या स्पर्धा सर्वांसाठी आहे. अधिकाधिक स्पर्धकांनी यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन करीत आहोत.
> **-महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.




**नेहरू अहवाल, कराची ठराव, भारत सरकार कायदा असे सारे प्रयत्न होत असले तरी स्वतंत्र देशाचे संविधान कसे असेल याविषयी सहमती होत नव्हती. त्यामुळे कम्युनिस्ट चळवळीतील महत्त्वाचे नेते, विचारवंत एम. एन. रॉय अस्वस्थ होते. अशी अवस्था येण्यास सारे राजकीय पक्ष कारणीभूत आहेत, अशी त्यांची भूमिका होती. गंमत म्हणजे त्यांनी स्वत: रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीची स्थापना केली होती.**

# पर्यायी जगाचे संकल्पचित्र



१९४४ साली त्यांनी स्वत:च 'स्वतंत्र भारताचे संविधान : मसुदा' या शीर्षकासह एक दस्तावेज प्रकाशित केला. त्यांच्या मते, या मसुद्यातून तीन बाबी होणे अपेक्षित होते : १. ब्रिटिशांकडून भारताकडे सत्तेचे हस्तांतर होत असताना राजकीय पक्षांची मध्यस्थी असता कामा नये. २. स्वतंत्र भारताच्या संविधानाचे संकल्पचित्र यातून साकारले जाईल. ३. सत्तांतराच्या प्रक्रियेला वेग येईल. ब्रिटिशांकडून होणारे सत्तांतर ही केवळ औपचारिकता आहे, असा त्यांचा समज होता. भारताकडे सत्ता सोपवत असताना नेमकी ती कोणाकडे सोपवली जाणार, हा प्रश्न होताच. लोकांकडेच ही सत्ता असली पाहिजे, यासाठी लोकांचे सार्वभौमत्व अधोरेखित करणारे संविधान लिहिण्याचा प्रयत्न रॉय यांनी केला. त्यामुळेच त्यांनी सत्तेचे विकेंद्रीकरण करत प्रत्यक्ष लोकशाही आणण्याकरिता प्रयत्न केले. देशभर लोकांच्या समित्या स्थापन करून सर्व लोकांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेण्याचे प्रारूप त्यांनी मांडले. रॉय यांनी प्रस्तावित केलेल्या या संविधानात १३ प्रकरणे आहेत. यात प्रामुख्याने कामगारांसाठी तरतुदी आहेत. कामगारांना केंद्रबिंदू मानून रॉय यांनी हा मसुदा तयार केला होता. कामगारांना राजकीय दर्जा मिळावा, त्यांच्या नागरिकत्वाशी जोडलेले सर्व मूलभूत हक्क असले पाहिजेत, असे त्यांचे आग्रही प्रतिपादन होते. कोणत्याही कामगाराला दिवसातील आठ तासांहून अधिक श्रम करायला लागू नयेत. त्यांना अडचणीच्या वेळी पगारी रजा मिळावी, असे मुद्दे यात मांडण्यात आले होते. या मसुद्याने कामगारांना केंद्रस्थानी आणले. जमिनीचे राष्ट्रीयीकरण केले जावे, हा एक अतिशय मूलगामी मुद्दा या संविधानात मांडण्यात आला होता. जमिनीची असमान मालकी हे भारतातील आर्थिक विषमतेचे प्रमुख कारण आहे आणि त्यामुळे जमिनीचे राष्ट्रीयीकरण करणे हे त्याचे उत्तर असू शकते, अशी रॉय यांची धारणा होती. रशियातील जमिनीच्या राष्ट्रीयीकरणाचा प्रयोग रॉय यांच्या डोळयासमोर होता. याशिवाय निवडणुकीत प्रमाणबद्ध प्रतिनिधित्व असले पाहिजे जेणेकरून लोकांचे योग्य प्रतिनिधित्व होऊ शकेल, असे त्यांचे मत होते. अल्पसंख्याकांसाठी विभक्त मतदारसंघांची तरतूद या मसुद्यातही होती. थोडक्यात, समतेचे मूल्य अधोरेखित करणारा आणि स्वतंत्र भारताला विकासाची दिशा सांगणारा असा हा मसुदा होता. तत्त्वज्ञ असलेल्या रॉय यांचा नव्या मानवतावादाची पायाभरणी करण्याचा हा प्रयत्न होता. रॉय यांचा हा मसुदा हा स्वप्नाळू होता आणि बऱ्याच प्रमाणात अव्यवहार्य होता, मात्र त्यांनी तयार केलेल्या या मसुद्यामुळे स्वतंत्र भारताच्या संविधानात समाजवादी तत्त्वांचा अंतर्भाव होण्यास मदत झाली, असे ग्रॅनवील ऑस्टिन यांनी म्हटले आहे. मुळात स्वतंत्र भारताच्या नव्या संविधानासाठी संविधानसभा असली पाहिजे, ही कल्पनाच सर्वप्रथम रॉय यांनी मांडली. प्रत्येक वेळी स्वप्ने प्रत्यक्षात येतातच असे नव्हे; पण स्वप्नांचे संकल्पचित्र रेखाटत राहिले पाहिजे, असे या मसुद्यातून लक्षात येते. कारण तेव्हाच स्वप्नलोकाच्या (युटोपिया) बांधकामाची सुरुवात होऊ शकते. म्हणूनच रॉय यांनी पर्यायी जगाचे संकल्पचित्र मांडण्याचा केलेला प्रयत्न विशेष दखलपात्र ठरतो. १९४४ साली त्यांनी स्वत:च 'स्वतंत्र भारताचे संविधान : मसुदा' या शीर्षकासह एक दस्तावेज प्रकाशित केला. त्यांच्या मते, या मसुद्यातून तीन बाबी होणे अपेक्षित होते : १. ब्रिटिशांकडून भारताकडे सत्तेचे हस्तांतर होत असताना राजकीय पक्षांची मध्यस्थी असता कामा नये. २. स्वतंत्र भारताच्या संविधानाचे संकल्पचित्र यातून साकारले जाईल. ३. सत्तांतराच्या प्रक्रियेला वेग येईल. ब्रिटिशांकडून होणारे सत्तांतर ही केवळ औपचारिकता आहे, असा त्यांचा समज होता. भारताकडे सत्ता सोपवत असताना नेमकी ती कोणाकडे सोपवली जाणार, हा प्रश्न होताच. लोकांकडेच ही सत्ता असली पाहिजे.

## संपादकीय »

# मिजास, मर्यादा!

***बाजारपेठी अर्थशास्त्राच्या रेट्याखाली बदल करत जायचे पण नियमनाचा मुद्दा मात्र विसरायचा, यामुळे त्रास भोगावा लागतो तो प्रवाशांना वा ग्राहकांनाच..***

भौतिक प्रगतीमुळे साधन-संपत्ती आणि सुविधा सहज उपलब्ध होऊ शकतात. पण संस्कृती मात्र कष्टसाध्य असते आणि कष्टांमुळे प्राप्त झाली तरी ती जपण्या आणि जोपासण्यासाठी अधिक कष्ट करावे लागतात. या कष्टांअभावी काय होते याची उदाहरणे आपल्याकडे मुबलक आढळतील. मोटार घेण्याची श्रीमंती चालकाची सांस्कृतिक श्रीमंती दर्शवेलच असे नाही. भौतिक प्रगतीमुळे मोबाइल फोन हातो-हाती आले. पण हे 'उबर'चे चालक आणि ही सेवा आधीच्या रिक्षा वा टॅक्सीवाल्यांपेक्षा किती वेगळी आहे हे स्पष्ट करण्याची गरजच नाही. भाडे नाकारणे, नोंदवल्यावर न येणे, खटारास्मरण करून देणाऱ्या मोटारी आणि चालत्या मोटारीचा दरवाजा उघडून पिंपभर पिंकणारे चालक हे आपल्या कोणत्याही शहरातील सर्रास दृश्य. इतके दिवस हे सारे रस्ते, लोहमार्ग इत्यादींपुरतेच मर्यादित होते.

**अमेरिकेचे माजी आणि इच्छुक अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आयोवा राज्यातील रिपब्लिकन पक्षांतर्गत मेळाव्यात (कॉकस) अध्यक्षपदासाठी पसंतीचा उमेदवार २० तापमान, हिमवादळे अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत रिपब्लिकन पक्षाच्या नोंदणीकृत मतदारांनी अध्यक्षपद उमेदवारीसाठी ट्रम्प यांच्या पारड्यात भरभरून मते टाकली.**

# आयोवात ट्रम्पयुगाची नांदी!



अमेरिकेच्या अध्यक्षपद निडणुकीच्या प्रदीर्घ चक्राचा आयोवा कॉकस म्हणजे खरे तर पहिलाच टप्पा. या कॉकसच्या निकालातून बहुतेकदा अध्यक्षपदाचे अंतिम उमेदवार कोण असतील, याचा अंदाज लावला जातो. आयोवा जिंकणारेच अध्यक्षपदावर विराजमान होतात, असे नाही. खुद्द ट्रम्प २०१६ मध्ये आयोवा कॉकसमध्ये टेड क्रूझ यांच्याकडून पराभूत झाले होते. अर्थात अध्यक्षीय निवडणुकीत मात्र २०१६ आणि २०२० अशा दोन्ही वेळेस आयोवाच्या मतदारांची पसंती डोनाल्ड ट्रम्पनाच होती. अलीकडच्या काळात रोनाल्ड रीगन, जॉर्ज बुश थोरले आणि जॉर्ज बुश धाकटे असे तिघेच आयोवा जिंकून व्हाइट हाऊसपर्यंत जाऊ शकले. तर २००८ ते २०१६ या काळात आयोवा कॉकसमध्ये जेत्या ठरलेल्या रिपब्लिकन नेत्यांना त्या पक्षाकडून अध्यक्षपद निवडणूक उमेदवारी मिळली नव्हती. पण आयोवातून कौल नाही तरी कल समजून येतो. यंदा 'ट्रम्पवापसी'ची जी हुरहुर लागून राहिली आहे, तिची चाहूलच जणू या निवडणुकीतून मिळाली. डोनाल्ड ट्रम्प यांना आयोवातील नोंदणीकृत मतदारांपैकी जवळपास ५० टक्क्यांहून अधिक मतदारांनी पहिली पसंती दिली. रिपब्लिकन पक्षात 'ट्रम्प विरुद्ध इतर' हा मामला किती एकतर्फी आहे, याची काहीशी झलक यानिमित्ताने पाहावयास मिळाली. कारण गेल्या वर्षीच्या सुरुवातीस ट्रम्प यांचे प्रबळ प्रतिस्पर्धी मानले गेलेले रॉन डेसान्टिस २१ टक्के मते मिळवून दुसऱ्या क्रमांकावर, तर आणखी एक प्रतिस्पर्धी निकी हॅली या १९ टक्के मतांसह तिसऱ्या क्रमांकावर फेकल्या गेल्या. ट्रम्प यांच्याच धोरणांना अधिक भडकपणे मांडणारे भारतीय वंशाचे विवेक रामस्वामी हे तर चौथ्या क्रमांकावर फेकले गेले. आयोवा आणि एकंदरीतच अमेरिकेतील राजकीय वाऱ्यांची दिशा पाहून या रामस्वामींनी थेट अध्यक्षीय उमेदवार लढतीतूनच माघार घेत असल्याचे जाहीर करून टाकले. शोभेचे दैवतच पुजले जात असताना पूजेच्या वेगळया दैवताची गरज राहात नाही, हे रामस्वामींनी बहुधा ताडले असावे. आता ते ट्रम्प यांचे परमभक्त बनले असून, त्यांच्या बाजूने प्रचारही करणार आहेत. कॉकस आणि प्रायमरीज किंवा पक्षांतर्गत निवडणुकांचा हा माहौल अमेरिकेमध्ये जानेवारी ते मार्चदरम्यान राहतो. ट्रम्प यांच्या आयोवा विजयाची माध्यमांकडून दखल घेतली जात असताना, डेमोक्रॅटिक पक्षातील सामसूम अस्वस्थ करणारी ठरते. रिपब्लिकन पक्षाप्रमाणेच डेमोक्रॅटिक पक्षाचीही पंचाईत अशी, की अध्यक्ष जो बायडेन यांना सक्षम असा प्रतिस्पर्धीच पक्षात निर्माण होऊ शकलेला नाही. वयोवृद्ध बायडेन यांच्यात ट्रम्प यांना सामोरे जाण्याइतपत ऊर्जा शिल्लक आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।  
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।  
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

\- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पंतप्रधान नरेंद्र मोदींचंही वय झालं

## वयोमानावरुन नाना पटोले यांची खोचक टीका

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणूक जशी जशी जवळ येत आहे. तसा राजकीय घडामोडींना वेग येत आहे. दोन दिवसांपूर्वी काँग्रेसचे तरूण नेते मिलिंद देवरा यांनी शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर आता माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांना भाजपाची ऑफर मिळाली असल्याचे समोर आले आहे. या सर्व विषयांवर माध्यमांशी बोलत असताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपावर सडकून टीका केली.**



"महाराष्ट्र भाजपापासून दूर चालला आहे, याचा अहवाल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्राप्त झालेला आहे. यासाठी पंतप्रधान मोदी वारंवार राज्याचे दौरे करत आहेत. पण कितीही दौरे केले तरी त्याचा काही फरक पडणार नाही. महाराष्ट्रातील जनता सुजाण असून भाजपाला यावेळी मत देणार नाही. त्यासाठीच महाराष्ट्रात सत्तेत बसलेल्या भाजपाप्रणीत सरकारने राज्यात स्थानिक स्वराज संस्थेच्या निवडणुका अद्याप घेतलेल्या नाहीत. दोन लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणूक घेतलेली नाही. उच्च न्यायालयानेही याबाबतीत निवडणूक आयोगावर ताशेरे ओढले आहेत", असा आरोप नाना पटोले यांनी केला.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रातून लोकसभा निवडणुकीला उभे राहावे, असे विधान नितेश राणे यांनी नुकतेच केले आहे. यावर नाना पटोले यांना टिव्ही ९ वृत्तवाहिनीने प्रश्न विचारला असता ते म्हणाले की, पंतप्रधान मोदी महाराष्ट्रातून निवडणुकीला उभे राहिले तरी ते पराभूत होतील. "भाजपाचा देव जरी महाराष्ट्रातून उभा राहिला तरी पराभूत होईल. आमचे देव प्रभू श्रीराम आहेत. पण भाजपाच्या लोकांसाठी त्यांचे दोन नेतेच देव आहेत. त्यांनी आपल्या राजकारणासाठी प्रभू श्रीरामालाही कमी दाखविण्याचा प्रयत्न केला", असाही आरोप त्यांनी केला. "भाजपा महाराष्ट्रात पराभूत होत असल्यामुळेच त्यांनी काँग्रेस पक्षाचे नेते आपल्याकडे खेचण्यास सुरुवात केली आहे. हेच भाजपाच्या पराभवाचे लक्षण आहे. आज एक व्हिडिओ व्हायरल झाला. ज्यात दिसले की, एका गाडीत महायुतीचे नेते मावत नव्हते. एकमेकांच्या मांडीवर बसण्याची नेत्यांवर वेळ आली. तरीही पक्षात आणखी नेते घेण्याचा प्रयत्न महायुतीकडून होत आहे", असा टोलाही नाना पटोले यांनी लगावला.८३ वर्षीय सुशीलकुमार शिंदेंना पक्षात घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. याबाबत बोलताना नाना पटोले म्हणाले, "वयोमानाच्या मर्यादा भाजपाने इतरांसाठी लावल्या आहेत. पण त्यांनी स्वतः पद सोडलेले नाही. अजित पवार यांच्यात हिंमत असेल तर आता पंतप्रधान मोदींना निवृत्त व्हा, असे त्यांनी बोलून दाखवावे. मग बघा त्यांचा ७० हजार कोटीचा भ्रष्टाचार कसा बाहेर येतो. राहुल गांधींची मणिपूरमधून भारत जोडो न्याय यात्रा सुरू होत असताना काँग्रेसचा एक नेता शिंदे गटात गेला. अजूनही काँग्रेसचे नेते खेचण्याचा प्रयत्न होत असला तरी काँग्रेसवर त्याचा काहीही फायदा होणार नाही. जनता या नेत्यांना धडा शिकवेल, असेही नाना पटोले यांनी यावेळी सांगितले.नाना पटोले पुढे म्हणाले की, मागच्या काळात कसबा विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक असेल किंवा विधानपरिषदेच्या निवडणुका असतील त्याठिकाणी भाजपाचा पराभव झालेला आहे. वातावरण भाजपाच्या विरोधात आहे. ४० जागांवर महायुतीचा पराभव होईल, असे सर्व्हेतून दिसत आहे, त्यामुळेच भाजपाचे नेते वारंवार राज्याच्या दौऱ्यावर येत असल्याचा दावा त्यांनी केला.

### आमचे देव प्रभू श्रीराम आहेत

उच्च न्यायालयानेही याबाबतीत निवडणूक आयोगावर ताशेरे ओढले आहेत", असा आरोप नाना पटोले यांनी केला.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रातून लोकसभा निवडणुकीला उभे राहावे, असे विधान नितेश राणे यांनी नुकतेच केले आहे. यावर नाना पटोले यांना टिव्ही ९ वृत्तवाहिनीने प्रश्न विचारला असता ते म्हणाले की, पंतप्रधान मोदी महाराष्ट्रातून निवडणुकीला उभे राहिले तरी ते पराभूत होतील. "भाजपाचा देव जरी महाराष्ट्रातून उभा राहिला तरी पराभूत होईल. आमचे देव प्रभू श्रीराम आहेत. पण भाजपाच्या लोकांसाठी त्यांचे दोन नेतेच देव आहेत. त्यांनी आपल्या राजकारणासाठी प्रभू श्रीरामालाही कमी दाखविण्याचा प्रयत्न केला", असाही आरोप त्यांनी केला. "भाजपा महाराष्ट्रात पराभूत होत असल्यामुळेच त्यांनी काँग्रेस पक्षाचे नेते आपल्याकडे खेचण्यास सुरुवात केली आहे. हेच भाजपाच्या पराभवाचे लक्षण आहे. आज एक व्हिडिओ व्हायरल झाला. ज्यात दिसले की, एका गाडीत महायुतीचे नेते मावत नव्हते. एकमेकांच्या मांडीवर बसण्याची नेत्यांवर वेळ आली. तरीही पक्षात आणखी नेते घेण्याचा प्रयत्न महायुतीकडून होत आहे", असा टोलाही नाना पटोले यांनी लगावला.८३ वर्षीय सुशीलकुमार शिंदेंना पक्षात घेण्याचा प्रयत्न सुरू आहे.

# प्रणिती सुशीलकुमार शिंदे भाजपामध्ये जाणार का?

## सुशीलकुमार शिंदे यांनी राजकारणात उडवून दिली खळबळ

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे वरिष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांनी भाजपाकडून पक्षप्रवेशाची ऑफर मिळाली होती, असा गौप्यस्फोट करून आज महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडवून दिली. त्यानंतर राजकीय क्षेत्रातून यावर अनेक प्रतिक्रिया उमटल्या. काँग्रेसपेक्षा भाजपाच्याच नेत्यांनी हिरीरीने प्रतिक्रिया दिल्या.**



त्यात राज्याचे कॅबिनेट मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोलापूर येथे सुशीलकुमार शिंदे यांची भेट घेतली. त्यामुळे या गोंधळात आणखी भर पडली. शिंदे यांची भेट घेतल्यानंतर चंद्रकांत पाटील यांनी माध्यमांसमोर याबाबतचा खुलासा केला. "भाजपाने २०१९ सुशीलकुमार शिंदेंना अधिकृतपणे किंवा अनधिकृतपणे ऑफर दिलेली नाही. राज्यातील सुसंस्कृत घराण्यांपैकी शिंदे एक आहेत. त्यामुळे ते स्वतःच्या पक्षात असावेत, असे प्रत्येकाला वाटत असते. त्यांच्याशी आपुलकीने बोलत असताना आमच्या पक्षात या, असे कुणी म्हणाले असतील. पण ती काय राजकीय ऑफर म्हणता येणार नाही. राजकीय भेट ही वर्षानुवर्ष तुम्हाला कळणार नाही, इतक्या गुप्तपणे होत असते", अशी प्रतिक्रिया चंद्रकांत पाटील यांनी दिली. दर दुसरीकडे सुशीलकुमार शिंदे यांनीही माध्यमांशी बोलताना असेच सांगितले की, या गुप्त गोष्टी असतात. त्या जाहीरपणे सांगता येणार नाही.दरम्यान चंद्रकांत पाटील यांच्या भेटीनंतर माध्यमांनी सुशीलकुमार शिंदे यांचीही प्रतिक्रिया जाणून घेतली. तेव्हा त्यांनी या भेटीबाबत सविस्तर भाष्य केले."चंद्रकांत पाटील यांनी आज सोलापूर येथे होणाऱ्या १०० व्या नाट्यसंमेलनाचे निमंत्रण दिले. पालकमंत्री स्वतः येऊन स्थानिक नेत्यांना निमंत्रण देतात, ही चांगली बाब आहे. नाहीतर असे कार्यक्रम एका पक्षाचे होऊन जातात. मात्र कार्यक्रमात सर्व पक्षाच्या नेत्यांनी यावे, अशी त्यांची भूमिका आहे. याचा आनंद वाटला", असे सुशीलकुमार शिंदे म्हणाले. भाजपामध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्यास भाजपाचे नेते तुमचे स्वागत करणार आहेत, असा प्रश्न माध्यमांनी विचारला असता शिंदे म्हणाले.

### माझे आयुष्य काँग्रेसमध्ये गेले

भाजपाचे लोक स्वागत तर करणारच. पक्षात प्रवेश केल्यानंतर प्रत्येकाचेच स्वागत केले जाते. भाजपामध्ये प्रवेश करण्याबाबत आणखी स्पष्टपणे सांगताना सुशीलकुमार शिंदे म्हणाले की, मी याआधीच माझी भूमिका स्पष्ट केलेली आहे. माझे आयुष्य काँग्रेसमध्ये गेले, मी काँग्रेसी आहे. त्यामुळे कुठेही जाण्याचा प्रश्नच येत नाही. मग प्रणिती शिंदे या भाजपाच जाणार का? असा प्रश्न माध्यमांनी विचारला असता ते म्हणाले, "प्रणितीच्या मनात काय आहे, हे मी सांगू शकत नाही.

# कलश यात्रा राम मंदिरामध्ये पोहोचली

## रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठापणेला सुरूवात होणार

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**अयोध्येतील रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेच्या अनुष्ठानाला सुरूवात झाली असून कलश यात्रा (KALASH YATRA) राम मंदिरात पोहोचली आहे. आता रामलल्लाच्या प्रतिष्ठापणेच्या कार्यक्रमाला सुरूवात होणार असून रामलल्लाची मूर्ती गर्भगृहात बसवण्यात येणार आहे. त्यानंतर त्यासंबंधित वेगवेगळ्या विधींना सुरूवात करण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 22 जानेवारीला अयोध्येतील भगवान श्रीरामाच्या भव्य मंदिराचे उद्घाटन होणार आहे. यासाठी देशभरातील ऋषी-मुनींना आमंत्रित करण्यात आले आहे.**

अयोध्येमध्ये प्रभू रामलल्ला नव्याने बांधलेल्या मंदिरात प्रवेश करणार आहेत. रामजन्मभूमी संकुलाचा फेरफटका मारत रामलल्लाची मूर्ती मंदिरात नेण्यात येणार आहे. त्यासाठी शरयू नदीच्या पाण्याने गर्भगृह शुद्ध करण्यात आलं आहे. अयोध्येतील राम मंदिराच्या गर्भगृहात कर्नाटकचे शिल्पकार अरुण योगीराज यांचा पुतळा बसवण्यात येणार आहे. 5 वर्षांच्या रामललाच्या बालस्वरूपातील या पुतळ्यात ते कमळाच्या फुलावर उभे असलेले दिसतील आणि त्यांच्या हातात धनुष्यबाणही असेल.अधिवास प्रक्रिया आणि आचार्य: साधारणपणे प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात सात अधिवास असतात आणि व्यवहारात किमान तीन अधिवास केले जातात. 121 आचार्य असतील जे समारंभाच्या सर्व प्रक्रियेचे समन्वय, समर्थन आणि मार्गदर्शन करतील. श्री गणेशवर शास्त्री द्रविड हे सर्व प्रक्रियेचे निरीक्षण, समन्वय आणि मार्गदर्शन करतील आणि काशीचे श्री लक्ष्मीकांत दीक्षित हे मुख्य आचार्य असतील. 4. विशेष अतिथी: प्राण प्रतिष्ठा आदरणीय भारताचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी जी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आदरणीय सरसंघचालक श्री मोहन भागवत जी, उत्तर प्रदेशच्या राज्यपाल श्रीमती आनंदीबेन



पटेल जी, उत्तर प्रदेशचे आदरणीय मुख्यमंत्री श्री योगी आदित्यनाथ जी महाराज आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. 5. वैविध्यपूर्ण स्थापना: भारतीय अध्यात्म, धर्म, संप्रदाय, उपासनेच्या पद्धती, परंपरा, 150 हून अधिक परंपरांचे संत, महामंडलेश्वर, मंडलेश्वर, श्रीमहंत, महंत, नागा यांच्यासह 50 हून अधिक आदिवासी, गिरिवासी, तत्ववादी, बेटवासी या सर्व शाळांचे आचार्य. आदिवासी परंपरांचे प्रमुख लोक या कार्यक्रमात उपस्थित राहणार आहेत, जे अभिषेक सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी श्री राम मंदिर परिसरात येणार आहेत. 6. ऐतिहासिक आदिवासी सहभाग: भारताच्या इतिहासात प्रथमच पर्वत, जंगल, किनारपट्टी, बेटे इत्यादी भागातील रहिवासी एकाच ठिकाणी अशा कार्यक्रमात सहभागी होत आहेत. ते स्वतःच अद्वितीय असेल. 7. परंपरांचा समावेश आहे: शैव, वैष्णव, शाक्त, गणपत्य, पट्य, शीख, बौद्ध, जैन, दशनम शंकर, रामानंद, रामानुज, निंबार्क, मध्व, विष्णू नामी, रामसनेही, घिसपंथ, गरीबदासी, गौडिया, कबीरपंथी, वाल्मीकी ), माधव देव, इस्कॉन, रामकृष्ण मिशन, चिन्मय मिशन, भारत सेवाश्रम संघ, गायत्री परिवार, अनुकुल चंद्र ठाकूर परंपरा, ओडिशाचा महिमा समाज, अकाली, निरंकारी, नामधारी (पंजाब), राधास्वामी आणि स्वामीनारायण, वारकरी, वीर इत्यादी अनेक. आदरणीय परंपरा त्यात भाग घेतील. 8. दर्शन आणि उत्सव: गर्भगृहातील प्राणप्रतिष्ठा कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर, सर्व साक्षीदारांना दर्शन दिले जाईल. श्री रामलल्लाच्या अभिषेकासाठी सर्वत्र उत्साहाचे वातावरण आहे. अयोध्येसह संपूर्ण भारतभर तो मोठ्या उत्साहात साजरा करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. सोहळ्यापूर्वी विविध राज्यांतून लोक सतत पाणी, माती, सोने, चांदी, रत्ने, कपडे, दागिने, मोठमोठ्या घंटा, ढोल, सुवासिक वस्तू घेऊन येत असतात. त्यापैकी सर्वात उल्लेखनीय म्हणजे माँ जानकीच्या माहेरच्या घरी पाठवलेल्या भरस (मुलीच्या घराच्या स्थापनेच्या वेळी पाठवलेल्या भेटवस्तू), ज्या जनकपूर (नेपाळ) आणि सीतामढी (बिहार) येथील तिच्या आजीच्या घरातून अयोध्येत आणल्या गेल्या होत्या. रायपूर, दंडकारण्य भागात असलेल्या प्रभू यांच्या मातृगृहातून विविध प्रकारच्या दागिन्यांच्या भेटवस्तूही पाठवण्यात आल्या आहेत.

### भव्य मंदिराचे उद्घाटन होणार

» अयोध्येतील रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेच्या अनुष्ठानाला सुरूवात झाली असून कलश यात्रा (KALASH YATRA) राम मंदिरात पोहोचली आहे. आता रामलल्लाच्या प्रतिष्ठापणेच्या कार्यक्रमाला सुरूवात होणार असून रामलल्लाची मूर्ती गर्भगृहात बसवण्यात येणार आहे. त्यानंतर त्यासंबंधित वेगवेगळ्या विधींना सुरूवात करण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 22 जानेवारीला अयोध्येतील भगवान श्रीरामाच्या भव्य मंदिराचे उद्घाटन होणार आहे.

# आता 500 च्या नोटेवर श्रीरामाचा फोटो?

## RBI कडून 500 रुपयाची नवीन नोट जारी?

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**सध्या सोशल मीडियावर प्रभू श्रीरामाचा फोटो असलेली 500 रुपयांची नोट खूप चर्चेत आहे. आरबीआय (RBI) 500 रुपयांची नवीन नोट जारी केल्याची सोशल मीडीयावर चर्चा आहे. अयोध्येत राम मंदिरात 22 जानेवारीला रामललाची प्राणप्रतिष्ठा कार्यक्रम पार पडणार आहे. त्याआधी सध्या सोशल मीडियावर प्रभू श्रीरामाचा फोटो असलेला 500 रुपयांचा फोटो व्हायरल होत आहे.**




भारतीय रिझर्व्ह बँक ने 500 रुपयांची नवी नोट जारी केल्याचा दावा केला जात आहे. मेटाच्या मालकीचं सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इंस्टाग्रामवर काही पोस्टमध्ये असा दावा करण्यात आला आहे. यामागचं सत्य काय आहे, हे जाणून घ्या. रामललाचा प्राणप्रतिष्ठा विधींना सुरुवात झाली असून 22 जानेवारीला हा सोहळा संपन्न होईल. गुन्हेगार या संधीचा पुरेपूर फायदा घेताना दिसत आहेत. राम मंदिराच्या नावाखाली दररोज फसवणूक होत असल्याची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. आता प्रभू श्रीराम आणि राम मंदिराची फोटो असलेली 500 रुपयांची नोट सोशल मीडियावर चर्चेचा विषय बनली आहे. पण आरबीआयने खरोखरच राम मंदिराचा फोटो असलेली 500 रुपयांची नवीन नोट जारी केली आहेत का? जर तुम्हालाही अशी नोट मिळाली असेल तर यामागचं सत्य जाणून घ्या.राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर सोशल मीडियावर 500 रुपयांच्या नव्या नोटेचा फोटो व्हायरल होत आहे, ज्यामध्ये महात्मा गांधींऐवजी भगवान श्रीरामाचा फोटो आहे. रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यापूर्वी सरकारने नवीन 500 रुपयांच्या नोटांवरून महात्मा गांधींचा फोटो काढून त्याजागी भगवान श्रीरामाचे फोटो लावल्याचा दावा केला जात आहे. फॅक्ट चेक करणाऱ्या वेबसाइटने या प्रकरणी सत्य तपासण्याचा प्रयत्न केला असता महत्त्वाची बाब समोर आली आहे. प्रभू श्री रामाच्या फोटोसह व्हायरल होत असलेल्या 500 रुपयांच्या नोटांचा फोटो एडिट केलेला आणि बनावट असल्याचे फॅक्ट चेक आढळून आलं.

# फेब्रुवारीत पेट्रोल 10 रुपयांनी स्वस्त होणार?

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

2024 हे वर्ष निवडणुकांचे वर्ष आहे. त्यामुळं मतदारांना आकर्षित करण्यासाठी, महागाई (INFLATION) नियंत्रीत करण्यासाठी सरकारचे प्रयत्न सुरु आहेत. महागाई रोखण्यासाठी सरकारनं (GOVT) विविध उपाययोजना राबवल्या आहेत. अनेक पिकांसंदर्भात निर्यातबंदीचा (EXPORT BAN) निर्णय घेतला आहे. आता अशातच पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती (PETROL-DIESEL PRICE) देखील कमी होण्याची शक्यता वर्तवली जातेय. फेब्रुवारी महिन्यात पेट्रोल आणि डिझेलच्या दर 10 रुपयांनी कमी होण्याची शक्यता आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तिसऱ्या तिमाहीत तेल कंपन्यांचा नफा 75 हजार कोटी रुपयांवर पोहोचण्याची शक्यता आहे. त्यामुळं सरकार पेट्रोल आणि डिझेलच्या किमती कमी करण्यासाठी तेल कंपन्यांवर दबाव आणू शकते. यामुळं सर्वसामान्यांना काहीसा दिलासा मिळेल आणि 2024 च्या निवडणुकीपूर्वी महागाई नियंत्रणात ठेवण्यास मोठी मदत होईल असे दिसत आहे. निवडणुकीपूर्वी महागाईवर नियंत्रण मिळवण्यासाठी देशातील सरकारी तेल कंपन्या फेब्रुवारी महिन्यात पेट्रोल आणि डिझेल स्वस्त करु शकतात. दोन्हीच्या किमती 10 रुपयांनी कमी करण्याचा विचार केला जात आहे. तेल कंपन्यांचा नफा तिसऱ्या तिमाहीत 75 हजार कोटी रुपयांवर पोहोचण्याची शक्यता आहे.

# कतरिना अन् विजयच्यामेरी ख्रिसमला' IMDB कडून 8.8 चे रेटिंग!

कतरिना कैफ (KATRINA KAIF) आणि साऊथचा सुपरस्टार विजय सेतुपति ) यांचा मेरी ख्रिसमस हा गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आला आहे. श्रीराम राघवन यांनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर विक्रमी कमाई केल्याचे दिसून आले आहे. या सगळ्यात आणखी एक गुड न्युज समोर आली आहे. बदलापूर, अंधाधून सारख्या चित्रपटांमधून आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्यादिग्दर्शकांमध्ये श्रीराम राघवन यांचे नाव घ्यावे लागेल. त्यांच्या अंधाधून नावाच्या चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कारानं गौरविण्यात




आल्याचे दिसून आले आहे. अशातच आता प्रदर्शित झालेल्या मेरी ख्रिसमस नावाच्या चित्रपटाचं चाहत्यांनी, नेटकऱ्यांनी कौतुक केलं आहे. विजय सेतुपति, कतरिना कैफ यांची प्रमुख भूमिक असलेल्या मेरी ख्रिसमसनं थिएटरमध्ये रेकॉर्ड ब्रेक कामगिरी केली आहे. त्यामुळे मेरी ख्रिसमसच्या टीमच्या शिरपेचात एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. चित्रपट निर्माते श्रीराम राघवन यांच्या अलीकडील दिग्दर्शनातील उत्कृष्ट कलाकृती म्हणजे या चित्रपटाने चित्रपटगृहात चांगलीच कमाई तर केली आणि एका नवा रेकॉर्ड ब्रेक केला आहे. कतरिना कैफ आणि विजय सेतुपती यांच्या मुख्य भूमिका असलेला हा सिनेमॅटिक चित्रपटाने 8.8 रेटिंग मिळवले आहे.

## मोदींना जाणवली दीदींची कमी

अयोध्येतील राम मंदिर उद्घाटनाची देशभर चर्चा आहे. 22 जानेवारी 2024 रोजी प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडणार आहे. या सोहळ्याला विविध क्षेत्रातील मंडळी उपस्थित असणार आहेत. दरम्यान प्राणप्रतिष्ठा सोहळ्याआधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लता मंगेशकर यांची कमी जाणवली आहे. लता दीदींनी गायलेल्या शेवटच्या श्लोकचा व्हिडीओ त्यांनी सोशल मीडियावर शेअर केला आहे. लता मंगेशकर यांचे 6 फेब्रुवारी 2022 रोजी निधन झाले. वयाच्या 92 व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि लता मंगेशकर यांचं बहिण-भावाचं नातं होतं. मोदींसाठी लता दीदींनी सोशल मीडियावर अनेकदा खास पोस्ट शेअर केल्या आहेत. लता मंगेशकरांच्या निधनानंतर आलेल्या रक्षाबंधनालाही मोदींना दीदींची आठवण आली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक ट्वीट केलं आहे. या ट्वीटमध्ये त्यांनी लिहिलं आहे,"भारतीयांना 22 जानेवारी 2024 या दिवसाची प्रतीक्षा आहे. दरम्यान आपल्याला अनेकांची कमी जाणवत आहे. यातीलच एक म्हणजे लता दीदी. लता दीदींनी गायलेल्या एका श्लोकाचा व्हिडीओ शेअर करत आहे.



## कधी रिलीज होणार श्रीदेवी प्रसन्न?

अभिनेत्री सई ताम्हणकर आणि अभिनेता सिद्धार्थ चांदेकर यांचा श्रीदेवी प्रसन्न हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाचा ट्रेलर आणि टीझर काही दिवसांपूर्वी प्रेक्षकांच्या भेटीला आला. तसेच या चित्रपटातील तोच आहे हे गाणं देखील प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. याला प्रेक्षकांची पसंती मिळाली. आता या चित्रपटातील किसिंग सीनबाबत नुकत्याच एका मुलाखतीमध्ये सिद्धार्थनं सांगितलं आहे. सिद्धार्थनं श्रीदेवी प्रसन्न या चित्रपटातील किसिंग सीनबद्दल सांगितलं. तो म्हणाला, "चित्रपटात आमचा खूप रोमँटिक किसिंग सीन आहे. त्या सीननंतर मी आणि सई एकमेकांसोबत बोलत नव्हतो. किसिंग सीनच्या आधी पण आम्ही एकमेकांसोबत बोलत नव्हतो. नंतरही आम्ही नव्हतो बोलत. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही कॉफीला भेटलो. तेव्हा चर्चा केली आणि त्यावर न बोलण्याचं ठरवलं. कारण हे सगळं खूप अवघड होतं.""श्रीदेवी प्रसन्न' हा सिनेमा 2 फेब्रुवारी 2024 रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटातील 'दिल में बजी गिटार' हे गाणं 19 जानेवारीला रिलीज होत आहे. या चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत.'श्रीदेवी प्रसन्न' या चित्रपटात सई आणि सिद्धार्थ यांच्यासोबतच सुलभा आर्या, सिद्धार्थ बोडके, रसिका सुनील, संजय मोने, वंदना सरदेसाई, समीर खांडेकर, आकांक्षा गाडे, रमाकांत डायमा, शुभांगी गोखले, पाहुल पेठे, पल्लवी परांजपे, पूजा वानखेडे, सिद्धार्थ महाशब्दे, जियांश पराडे या कलाकारांनी देखील महत्वाची भूमिका साकारली आहे. "श्रीदेवी प्रसन्न" या चित्रपटाचे लेखन अदिती मोघे यांनी केले असून विशाल विमल मोढवे हे या चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत.



## रिचा चड्ढानं केलेल्या ट्वीटनं वेधलं लक्ष!

गेल्या काही दिवसांपासून इंडिगो एअरलाइन चर्चेत आहेत. काही दिवसांपूर्वी गोव्याहून दिल्लीला जाणाऱ्या इंडिगोच्या फ्लाईटला उशीर झाला. त्यामुळे संतापलेले प्रवासी एअरक्राफ्ट पार्किंगमध्ये बसले आणि तिथेच जमिनीवर बसून जेवण केलं. याचे फोटो आणि व्हिडीओ व्हायरल झाले होते. आता अभिनेत्री रिचा चड्ढानं देशभरातील विमानांना झालेल्या विलंबाबद्दल एक ट्वीट शेअर केलं आहे.रिचानं ट्वीटमध्ये लिहिलं, " हे तीन दिवसांतील माझ्या तिसऱ्या फ्लाइट्सबद्दल आहे. पहिल्या दिवशी इंडिगोला चार तासांपेक्षा जास्त उशीर झाला, दुसऱ्या दिवशी इंडिगोला पुन्हा चार तास उशीर झाला, काही मार्गांवर थेट फ्लाइट्स अनेकदा इंडिगोच्याच असतात. दिवस 3, आंतरराष्ट्रीय फ्लाइट- यात काही अडचण आली नाही" "14 जानेवारीला मुंबईत एअर शो होता, त्यामुळे सकाळी रनवे बंद करण्यात आला होता आणि नंतर उत्तर भारतात धुके/स्मॉग असल्यामुळे दिल्लीतील रनवे बंद करण्यात आला होता. देशभरातील विमानांना उशीर झाला. कर्मचाऱ्यांना जास्त काम करावे लागेल.", असंही रिचानं ट्वीटमध्ये लिहिलं.

# रोहितच्या उतार्‍यानंतर रिंकूचा तडाखा!

## » पाचव्या विकेटसाठी नाबाद 190 धावांची भागीदारी

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**२२ धावांवर चार गडी बाद अशी घसरगुंडी उडालेल्या भारतीय डावाला आकार देत कर्णधार रोहित शर्माने अफगाणिस्तानविरुद्धच्या तिसऱ्या ट्रेन्टी-२० सामन्यात नाबाद १२१ धावांची दिमाखदार खेळी साकारली. ट्रेन्टी-२० प्रकारातलं रोहितचं हे पाचवं शतक आहे. रोहित शर्माच्या या तडाखेबंद शतकी खेळीच्या बळावर भारताने २१२ धावांची मजल मारली. बंगळुरूचं छोटेखानी मैदान आणि अफगाणिस्तानची अननुभवी गोलंदाजी यांचा पुरेपूर फायदा उचलत रोहितने ११ चौकार आणि आठ षटकारांसह ही खेळी सजवली.**




मालिकेत विजयी आघाडी घेतलेल्या भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला होता. भारताने संजू सॅमसन, कुलदीप यादव आणि अवेश खान यांना अंतिम अकरा जणांच्या संघात संधी दिली. तिसऱ्या षटकात फरीद अहमदने उत्तम फॉर्मात असलेल्या यशस्वी जैस्वालला ४ धावांवर बाद केलं. आयपीएल स्पर्धेतील आरसीबी स्पर्धेचं मैदान असल्यामुळे विराट कोहलीकडून या सामन्यात प्रचंड अपेक्षा होत्या. पण कोहली पहिल्याच चेंडूवर भोपळाही न फोडता बाद झाला. कोहली बाद झाला आणि मैदानात स्मशानशांतता पसरली.पुढच्याच षटकात शिवम दुबेही तंबूत परतला. त्याला केवळ एका धाव करता आली. संजू सॅमसनला फरीदनेच पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. त्यालाही खातं उघडता आलं नाही. चार बाद २२ अशी अवस्था झालेल्या स्थितीतून संघाला बाहेर काढण्यासाठी कर्णधार रोहित शर्माला रिंकू सिंगची साथ मिळाली. रोहितच्या आक्रमक पवित्र्यामुळे रिंकूने बचावात्मक पवित्रा खेळ करत त्याला साथ दिली. या जोडीने सुरुवातीला एकेरी-दुहेरी धावांवर भर देत डावाची पडझड थांबवली. खेळपट्टीवर स्थिरावल्यानंतर रोहितने भात्यातल्या फटक्यांची पोतडी उघडत अफगाणिस्तानच्या गोलंदाजांचा समाचार घेतला. अझमतुल्ला ओमरझाइच्या चौथ्या षटकातल्या चौथ्या चेंडूवर चौकार खेचत रोहितने या प्रकारातल्या पाचव्या शतकाला गवसणी घातली.रोहित-रिंकू जोडीने पाचव्या विकेटसाठी ९५ चेंडूत १९० धावांची मॅरेथॉन भागीदारी साकारली. रिंकूने कर्णधाराला तोलामोलाची साथ देत ३९ चेंडूत नाबाद ६९ धावांची खेळी साकारली. त्याने २ चौकार आणि ६ षटकार लगावले. करिम जनतने टाकलेल्या २० व्या षटकात रोहित-रिंकूने तब्बल ३६ धावा चोपून काढल्या. या जोडीने ट्रेन्टी-२० प्रकारात एका षटकात सर्वाधिक धावांच्या युवराज सिंहच्या विक्रमाची बरोबरी केली. २००७ च्या टी-२० विश्वचषकात युवराज सिंहने स्टुअर्ट ब्रॉडच्या गोलंदाजीवर ६ षटकारांसह ३६ धावा वसूल केल्या होत्या. तर अखिल धनंजयच्या गोलंदाजीवर कायरन पोलार्डने ३६ धावा कुटल्या होत्या. या सगळ्या धुमश्चक्रीत फरीद अहमदने चार षटकात २० धावांच्या मोबदल्यात ३ विकेट्स पटकावल्या.रोहित शर्मा आणि रिंकू सिंह यांच्या शानदार फलंदाजीच्या जोरावर भारताने 212 धावांचा पाऊस पाडला. अतिशय कठीण परिस्थितीमध्ये रोहित शर्मा आणि रिंकू सिंह यांनी भारताच्या डावाला आकार दिला. एकवेळ भारत 4 बाद 22 अशा स्थितीत होता, पण तेथूनच रोहित आणि रिंकू यांचा शो सुरु झाला. या जोडीने शेवट तर अतिशय विस्फोटक केला. रिंकू आणि रोहित यांनी 20 व्या षटकांमध्ये तब्बल 36 धावा वसूल केल्या. यामध्ये पाच षटकारांचा समावेश आहे. रिंकू सिंह याने तर अखेरच्या तीन चेंडूवर तीन षटकार मारत भारताची धावसंख्या 200 पार पोहचवली. करीम जनत याची रिंकू आणि रोहित शर्मानं धुलाई केली. करीम जनत याच्या टी 20 करिअरमधील हे सर्वात महागडं षटक असेल. अखेरच्या षटकातील 36 धावांचा पाऊस पाहून चाहत्यांना युवराज सिंह याच्या 2007 विश्वचषकातील खेळीची आठवण झाली.

### जैस्वालला 4 धावांवर बाद

» भारताने संजू सॅमसन, कुलदीप यादव आणि अवेश खान यांना अंतिम अकरा जणांच्या संघात संधी दिली. तिसऱ्या षटकात फरीद अहमदने उत्तम फॉर्मात असलेल्या यशस्वी जैस्वालला ४ धावांवर बाद केलं. आयपीएल स्पर्धेतील आरसीबी स्पर्धेचं मैदान असल्यामुळे विराट कोहलीकडून या सामन्यात प्रचंड अपेक्षा होत्या. पण कोहली पहिल्याच चेंडूवर भोपळाही न फोडता बाद झाला. कोहली बाद झाला आणि मैदानात स्मशानशांतता पसरली.पुढच्याच षटकात शिवम दुबेही तंबूत परतला. त्याला केवळ एका धाव करता आली. संजू सॅमसनला फरीदनेच पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. त्यालाही खातं उघडता आलं नाही. चार बाद २२ अशी अवस्था झालेल्या स्थितीतून संघाला बाहेर काढण्यासाठी कर्णधार रोहित शर्माला रिंकू सिंगची साथ मिळाली. रोहितच्या आक्रमक पवित्र्यामुळे रिंकूने बचावात्मक पवित्रा खेळ करत त्याला साथ दिली. या जोडीने सुरुवातीला एकेरी-दुहेरी धावांवर भर देत डावाची पडझड थांबवली. खेळपट्टीवर स्थिरावल्यानंतर रोहितने भात्यातल्या फटक्यांची पोतडी उघडत अफगाणिस्तानच्या गोलंदाजांचा समाचार घेतला. अझमतुल्ला ओमरझाइच्या चौथ्या षटकातल्या चौथ्या चेंडूवर चौकार खेचत रोहितने या प्रकारातल्या पाचव्या शतकाला गवसणी घातली.रोहित-रिंकू जोडीने पाचव्या विकेटसाठी ९५ चेंडूत १९० धावांची मॅरेथॉन भागीदारी साकारली.

# झिम्बाब्वेचा ११ चेंडूत ३४ धावा करून विजय!

## » अँजेलो मॅथ्यूजने अखेरच्या षटकात त्याने पाच चेंडूत 24 धावा दिल्या

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**श्रीलंका आणि झिम्बाब्वे यांच्यातील टी-२० मालिकेतील दुसरा सामना खूपच रोमांचक झाला. आर. प्रेमदासा स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात झिम्बाब्वेने सहा गडी राखून रोमहर्षक विजय मिळवला आणि तीन सामन्यांच्या मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली. झिम्बाब्वेचा हा श्रीलंकेविरुद्धचा पहिला टी-२० विजय होता.**

१७४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना झिम्बाब्वेला शेवटच्या षटकात २० धावांची गरज होती. अँजेलो मॅथ्यूजने हे षटक टाकले आणि एक चेंडू शिल्लक असताना झिम्बाब्वेने चार विकेट्स राखून विजय मिळवला.सामन्याच्या पहिल्या डावात नाबाद ६६ धावा करून श्रीलंकेची धावसंख्या १७० धावांच्या पुढे नेणाऱ्या मॅथ्यूजने अखेरच्या षटकात अनेक धावा दिल्या. त्याच्या षटकात तीन षटकार मारले गेले आणि संघाचा सामना गमवावा लागला. झिम्बाब्वेसाठी ल्यूक जोंगवेने दोन आणि मदंडेने शेवटच्या षटकात एक षटकार ठोकला. जोंगवेनेही चेंडूवर दोन विकेट्स देखील घेतल्या. त्याच्या उत्कृष्ट अष्टपैलू कामगिरीसाठी त्याला सामनावीर





म्हणून गौरवण्यात आले. रोमहर्षक सामन्यानंतर आनंद व्यक्त करताना जोंगवे म्हणाला, “माझ्याकडे शब्द नाहीत. आज आम्ही जे काही केले त्यामुळे मी खूप आनंदी आहे.”शेवटच्या षटकात जोंगवेच्या आक्रमक फलंदाजीने सामना झिम्बाब्वेच्या बाजूने वळवला. संघाला ६ चेंडूत २० धावांची गरज होती, पण पहिल्या चेंडूवर षटकार आणि मॅथ्यूजचा नो बॉल यामुळे ६ चेंडूत १३ धावा असे समीकरण झाले. जोंगवेने फ्री हिटवर एक चौकार आणि पुढच्या चेंडूवर आणखी एक षटकार मारून आपले आक्रमण सुरू ठेवले, चार चेंडूत फक्त तीन धावा आवश्यक होत्या. पुढच्या चेंडूवर मॅथ्यूजने एकही धाव दिली नाही, पण षटकाच्या चौथ्या चेंडूवर तिक्षणाने महत्त्वाचा झेल सोडला. त्यामुळे झिम्बाब्वेला एक धाव मिळाली आणि यष्टिरक्षक मदंडे स्ट्राइकवर आला. त्याने पाचव्या चेंडूवर षटकार ठोकला आणि झिम्बाब्वे संघाने सामना जिंकला. झिम्बाब्वेने डावाच्या १९व्या षटकात १० धावा केल्या आणि शेवटच्या षटकात २४ धावा केल्या. एकंदरीत झिम्बाब्वेने शेवटच्या ११ चेंडूत ३४ धावा करून सामना जिंकला. झिम्बाब्वेचा कर्णधार सिकंदर रझाला या विजयावर विश्वास ठेवणे कठीण झाले होते. तो म्हणाला, “आम्ही लढत राहिलो, जर शेवटपर्यंत सामना नेला तर नक्कीच जिंकू असा विश्वास होता.

### हार्दिक पांड्या मुंबईच्या जर्सीमध्ये

» संघाने ते करून दाखवले, याचा आनंद आहे. श्रीलंका आणि झिम्बाब्वे यांच्यातील टी-२० मालिकेतील दुसरा सामना खूपच रोमांचक झाला. आर. प्रेमदासा स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात झिम्बाब्वेने सहा गडी राखून रोमहर्षक विजय मिळवला आणि तीन सामन्यांच्या मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली.

# MahaENews

The fight for truth... the right to democracy!

www.mahaenews.com | THURSDAY, 18th JANUARY 2024 | Digital Edition | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


# Land will be acquired for widening of Wakad- Duttamandir road to 45 meters!

## Municipal Commissioner's assures society holders; BJP city president Shankar Jagtap held significant meeting

**Pimpri : Representative**

**The Wakad-Dattamandir road is a major link connecting Pimpri-Chinchwad and Hinjewadi IT hub and it will be developed as per the development plan. Pimpri-Chinchwad Municipal Commissioner and Administrator Shekhar Singh assured that current encroachment will be removed and the land will be acquired for widening this road to 45 meters.**




Pimpri-Chinchwad Municipal Administration had taken initiative and it was claimed that the concerned road will be 45 meters wide. However, in some places only 30 meters wide road is available for the goers. Therefore, in this regard altogether 27 societies in this area submitted written complaints to municipal administration.

Sighting this issue, BJP City President Shankar Jagtap came forward and a meeting was held with the Vice President of Pimpri-Chinchwad Society Federation, Sachin Londhe and representatives along with Municipal Commissioner Shekhar Singh and officials of the concerned department in the Municipal Building. Former corporator Vinayak Gaikwad was present on this occasion.

Local society owners have raised objections regarding widening of Wakad-Dattamandir road. As per the development plan, this road is expected to be 45 meters wide. The widening of Wakad-Datta mandir Road in Municipal Ward No. 25 has not taken place as per the Development Plan. In some places, there are illegal constructions and those are protected by the administration. The width of the road at that place is up to 30 meters only. There are unauthorized constructions on both sides of the road decreasing the width of the road. That is the reason; the society owners of the area are demanding that the work of the said road should be done as per the plan approved in the development plan. Meanwhile, BJP city president Shankar Jagtap and former corporator Vinayak Gaikwad took a positive initiative in this regard. A meeting was held with Municipal Commissioner and concerned officials and representatives of society holders in the presence of both of them. Also, it is demanded that whoever the farmers and the land owners have taken the compensation for the land; their land should be acquired by the municipal administration. It will gear up the work of the road. In this meeting, Commissioner Shekhar Singh has assured that the administration will take action regarding making 45 meters road as per the development plan and the process of acquiring land at some places will be started in a few days.





“Local citizens, society owners have often complained to the administration regarding the widening of Dutt Mandir road. This issue had been discussed repeatedly. Therefore, a meeting was held with the Commissioner Shekhar Singh and the concerned officials with the society owners. The road should be widened by implementing the development plan. We have suggested that the administration should take serious measures in view of the traffic stress on this route. Commissioner Shekhar Singh and concerned officials have responded positively to the sugestions.

**- Shankar Jagtap,** City President, BJP, Pimpri-Chinchwad.

“The objections raised by local society owners in the area of Wakad- Dutt Mandir Road regarding the widening of Dutt Mandir Road are valid. According to the development plan, the administration should make 45 meters of road available for citizens. The work of the road currently in progress should be inspected for this purpose. We have put this demand before the administration.

**- Sachin Londhe,**